# प्रेसनोट १६/०३/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

विमानतळ पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी गुन्हा रजि नं. १२७/२०१९, भा.द.वि. कलम- ४१९, ४४३, ४६५, ४७१,३४ व महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम- १२० यामध्ये २ आरोपींना अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत ...

दिनांक १४/०३/२०१९ रोजी पुणे लोहगाव नागरी विमानतळ येथे मनोज सन ऑफ राममुर्ती वय- ४३ वर्षे, निरीक्षक, सी. आय. एस. एफ. रा. बी- २०२, श्रीराम हिल व्हू, लोहगाव पुणे. हे दिवसपाळी इन्चार्ज म्हणून कर्तव्य करीत असतांना सायंकाळी १७/१४ वा.चे सुमा. त्यांचे सहकारी श्री.प्रदिपकूमार, निरीक्षक, सी.आय.एस.एफ यांनी एक इसम बनावट तिकिट दाखवून प्रस्थान गेट मधून विमानतळचे आत आला असल्याचे त्यांना कळवुन त्याचे बनावट तिकीट दाखवुन सदरचा इसमांस त्यांचेसमोर हजर केले असता त्यांनी त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता-सुधीर बाळकृष्ण शिंदे वय-४० वर्षे, रा. फ्लॅट नं.१, जय गणेश विहार, सी.डब्लू पॅलेस, किरकटवाडी,दास कंपनीच्या मागे,खडकवासला,पुणे. असे सांगितले.तेव्हा प्रस्थान गेट नं.२ येथे कर्तव्यावर हजर असलेले श्री.अनुराग यादव,सब इन्स्पपेक्टर यांचेकडुन त्यांना समजले की, सदरचा इसम हा एअर संशईत रित्या तेथे फिरत असल्याने,सदर इसमाचा त्यांना संशय आल्याने त्यांनी सदर इसमाचे विमानाचे तिकीट इंडिगो एअरलाईन्सचे कस्टमर सर्व्हिस स्टाफ नामे-दिनाज वाडीया यांचेकडे चेक करणेकामी दाखविले असता,श्रीमती दिनाज वाडीया यांनी सदर इसमाकडे असलेल्या विमानाचा पी.एन.आर नंबर-XY4YFL तपासला असता सदरचे विमानाचे तिकिट हे इसम नामे-अभिनव पात्रा यांचे असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे इसम नामे- सुधीर बाळकृष्ण शिंदे यांचेकडे सदरचे विमानाचे तिकिट कोठून आणले याबाबत त्यांनी चौकशी केली असता,त्याने सांगितले की,मी 'मी टुरिझमो' या ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये ड्रायव्हर म्हणून नोकरी करीत आहे.मी आज रोजी आठ लोकांना सुमारे ०३/०० वा.चे सुमारास लोहगाव नागरी विमानतळ येथे माझे कडील मिनी बस नंबर-एम.एच.१२/एन.एक्स/९६९१ यामधून सोडले होते.त्यावेळी सदर पॅसेंन्जर पैकी एका महिलेने मला गाडीचे भाडयाचे पैसे न देता ती विमानतळाचे आत निघून गेल्याने सदरबाबत मी माझे मालक नामे-सुमित दिलीप मालुसरे रा.१९९ सोमवार पेठ,दारुवाला पुल,सम्यग चेंबर,पुणे यांना फोनद्वारे सांगितल्याने त्यांनी मला लोहगाव नागरी विमानतळ येथे आत जाऊन सदर महिलेकडून भाडयाचे पैसे घेऊन येण्यास सांगितले.व लोहगाव नागरी विमानतळचे आत जाण्यासाठी त्यांनी मला त्यांचा मोबाईल नंबर-९९७०१२१५१४ यावरुन माझे मो.नं.९९२१२५१४४५ यावर वॉट्स अप द्वारे माझे नावाचे इंडिगो एअरलाईन्स विमानाचे तिकिट पाठविले.त्यानंतर सदरचे तिकिट मी लोहगाव नागरी विमानतळचे प्रस्थान गेट नं.२ येथे दाखवून लोहगाव नागरी विमानतळचे आतमध्ये आलो आहे. असे सांगितले. त्यावेळेस सदरचा प्रकार त्यांनी पोलीसांना कळविल्याने महिला पोलीस उप निरीक्षक चौधरी, संजयपार्क बिट मार्शल यांनी सदर ठिकाणी जावुन आरोपी नामे १. सुधीर बाळकृष्ण शिंदे, २. सुमित दिलीप मालुसरे यांना ताब्यात घेवुन त्यांना विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन मनोज सन ऑफ राममुर्ती निरीक्षक, सी. आय. एस. एफ.यांची फिर्याद घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यांना दिनांक १४/०३/२०१९ रोजी अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक चित्रा चौधरी करीत आहेत.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे**